# ग्रीनलॉन्स विदयालय

**दिनांक - १०-०२-२०२५ FINAL EXAMINATION (2025) वेळ - २तास**

**इयत्ता - ७ वी - अ,ब,क मराठी मार्क - ८०**

**INSTRUCTIONS:- 1.This paper comprises of two sections. Section A and B.**

**2. Section A answers must be written on the answer sheet.**

**3. Section B answers must be written on the paper itself. And**

**Attach paper with section A answer sheet.**

## विभाग - "अ " [४० मार्क]

प्रश्न १. कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. [५]

१. या मदतीची सुरवात ---------- करा.

( शाळेपासून, घरापासून, मित्रांपासून )

२. बाईमाणूस बोलते तरी कशी, हे पाहण्याची ---------- प्रत्येक पुरुषाला लागली.

( उत्कंठा, आतुरता, उत्कांठा )

३. पण दुसऱ्याचा आनंद आपल्याला ---------- देऊन जातो.

( समाधान, तृप्ती, संतुष्टी )

४. रमाबाईंचे आयुष्य म्हणजे ---------- आणि संकटांची एक दीर्घ साखळी आहे.

( संघषाची, लढा, संघर्षाची )

५. आईने तिला दिलेल्या ---------- छोट्या -छोट्या कथा होत्या.

( वहीत, पुस्तकात, ग्रंथात )

प्रश्न २ अ) कोण - कोणास म्हणाले ते लिहा. [२]

१. "मला एका शाळेत पाहुणी म्हणून बोलावले आहे."

२. "तुम्ही घरी किंवा इतर ठिकाणी कोणती मदत करता,त्याची नोंद ठेवा.

प्रश्न २ ब) खालील प्रश्नांची एका शब्दात उत्तरे लिहा. [४]

१. घरात एकोप्याने खेळणारे?

२. निसर्गाची भाषा फक्त कोणाला कळते?

३. कानोकानी कुजबुजताना अंकुर कसा आहे?

४. लेक घरात असताना काय पेटते?

प्रश्न २ क) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. **(कोणतेही ५)(ANY 5)** [५]

१. सोनालीने काय करावे असे आईला वाटत होते?

२. शब्दांच्या घरात कोण-कोण राहतात?

३. सोनालीला प्रोत्साहन देण्यासाठी तिच्या बाबांनी काय केले?

४. लेक कवितेच्या कवयित्री कोण आहेत?

५. शब्दांचे घर या कवितेचे कवी कोण आहेत?

६. काळ्या रात्रीला कशाची आशा लागते?

प्रश्न ३. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

कोलकाता शहरात देशभक्त आनंद मोहन यांनी स्त्रियांसाठी जी खास सभा बोलावली होती, ती भारतातील स्त्रियांची पहिली सभा होती. पंडिता रमाबाईंना त्या वेळी बंगाली भाषा येत नव्हती, म्हणून त्यांनी मायबोलीसारखा सराव असलेल्या संस्कृत भाषेतून भाषण केले. बंगालीतून त्याचा अनुवाद त्या वेळी करण्यात आला. स्त्रियांची पहिली सभा, पहिली स्त्री वक्ता व सादर करण्यात आलेला पहिलाच मौखिक अनुवाद ही त्या सभेची वैशिष्ट्ये ठरली. स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले जात असताना एक परप्रांतातील परभाषक स्त्री महाभारतकालीन संदर्भ देऊन स्त्रियांच्या सभेत प्रबोधन करते, ही घटनाच फार आगळीवेगळी होती.

आई, वडील व बंधू यांच्या निधनानंतर एकटे जगणे किती कठीण आहे, हे अनुभवल्यावर रमाबाईंनी विवाह करण्याचे ठरवले. अतिशय विद्वान वकील म्हणून ख्याती असलेल्या बिपिनबिहारी मेधावी यांच्याशी त्या रीतसर विवाहबद्ध झाल्या. त्या वेळी त्यांचे वय बावीस वर्षांचे म्हणजे त्या दृष्टीने फारच वाढलेले होते. विवाहानंतर दोन वर्षांच्या आतच बिपिनबाबूंचे निधन झाले.स्त्रियांनी शिकले व शिकवले पाहिजे, त्यासाठी आपल्या मातृभाषेचे अचूक ज्ञान प्राप्त केले पाहिजे. शिक्षिका म्हणून उभ्या राहण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्त्या दिल्या पाहिजेत, अशी शिफारस त्यांनी हंटर कमिशनकडे केली.

मुलींना स्वावलंबी करत असताना रमाबाईंनी लहान उदयोग व्यवसाय सुरु केले. वेताच्या खुर्च्या विणणे,लेस,स्वेटर,मोजे विणणे,भांडण्यावर नावे घालणे,घाण्यावर तेल काढणे. असे कितीतरी प्रकारचे उदयोग स्त्रिया करत. 'मला भारतातील सर्व स्त्रिया सारख्याच आहेत. जेथपर्यंत माझ्या शरीरात रक्ताचा एक बिंदुमात्र आहे, तेथपर्यंत आपल्या स्त्री-जातीचे कल्याण व सुधारणा करण्याच्या कामापासून मी पराङ्मुख होणार नाही. स्त्री-जातीची सुधारणा करण्याचे व्रत मी धारण केले आहे. रमाबाईंची कन्या मनोरमा परदेशातून ब्रेल लिपी शिकून आल्यामुळे अंध स्त्रियांच्या शिक्षणाची सोय झाली.

प्रश्न :-

कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [३]

१. स्त्रियांची पहिली सभा बोलावणारे कोण होते?

२. रमाबाईंची कन्या मनोरमा परदेशातून कोणती लिपी शिकून आली होती?

३. रमाबाईंनी कोणते व्रत धारण केले होते?

कृती २. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. रमाबाईंनी स्त्रियांसाठी कोणते लहान उदयोग सुरु केले?

कृती ३. रिकाम्या जागा भरा. [१]

१. मायबोलीसारखा सराव असलेल्या ---------- भाषेतून भाषण केले.

२. शिक्षिका म्हणून उभ्या राहण्यासाठी स्त्रियांना प्रोत्साहन म्हणून ---------- दिल्या पाहिजेत.

कृती ४.खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [२]

( ख्याती, मायबोली, स्त्री, विवाह, भाषांतर, उत्तेजन )

१. मातृभाषा - ---------- २. प्रसिद्धी - ----------

३. महिला - ---------- ४. लग्न - ----------

प्रश्न ४ खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर पत्र लिहा. **(ANY 1)** [५]

१. तुमच्या भावाला ( Younger Brother ) जिल्हा स्तरावरील( State Leval) चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ( Got 1st Prize in Drawing Competition) त्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. (Congratulation Letter)

**OR**

२. तुमची आई आजारी असल्यामुळे (Mother is not well) तुम्ही चार दिवस शाळेत जाऊ(Four days Leave) शकणार नाही.(not attending the School) यासाठी वर्गशिक्षकांना (to your Class Teacher) पत्र लिहा.

प्रश्न ५ खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा. **(ANY 1)** [५]

१. खरा मित्र - मित्राचे नाव - मित्राचे वर्णन - मित्राचा स्वभाव - तुम्हाला आवडलेले त्याचे गुण.

२. वाचनाचे महत्त्व - वाचन का करावे - किती करावे - कोणते वाचन करावे - वाचनाचा फायदा.

३. माझी आजी - आजीचे नाव - आजीचे वर्णन - तिचा स्वभाव - आजी का आवडते.

प्रश्न ६. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.

छत्रपतीशिवाजी महाराज हे थोर राष्ट्रपुरूष होते. त्यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६२७ रोजी "शिवनेरी" किल्ल्यावर झाला. त्यांच्या आईचे नाव जिजाबाई व वडिलांचे नाव शहाजी राजे भोसले होते. दादोजी कोंडदेव हे त्यांचे गुरु होते. त्यांनी शिवरायांना युद्धनिती व राजनितीचे शिक्षण दिले. त्यांच्या आईने त्यांच्यावर चांगले संस्कार केले.

शिवरायांच्या काळात मोगलांचे राज्य होते. मोगल लोकांवर अन्याय करत, गरीबांना त्रास देत असत. शिवरायांना हा अन्याय सहन होत नसे. म्हणून ते अन्यायाविरूद्ध लढले. त्यांनी मोगलांचे अनेक किल्ले जिंकले. शत्रूना पराजीत केले. त्यांनी नेहमीच जनतेला सुखी करण्याचा प्रयत्न केला.

३ एप्रिल १६८० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन झाले.

प्रश्न :-

कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. शिवाजी महाराजांच्या आई व वडिलांचे नाव काय होते?

२. शिवाजी महाराजांच्या गुरूंचे नाव काय होते?

कृती २. खालील प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा. [२]

१. शिवाजीच्या काळात कोणाचे राज्य होते? ते काय करत असत ?

कृती ३. खालील इंग्रजी शब्दांचे अर्थ मराठीत लिहा. [२]

( निधन, गरीब, अन्याय, शत्रू, प्रयत्न )

१. Enemy - ---------- २. Poor - ----------

३. Injustice - ---------- ४. Death - ----------

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

**नाव -** ---------- **हजेरी क्र. -** ---------- **इयत्ता - ७ वी - अ,ब,क**

**विभाग - "ब"** **[४० मार्क]**

प्रश्न १. खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा. [५]

| मदत करणे, यशस्वी होणे, कौतुक करणे, वशिला लावणे, प्रेरणा देणे, चिंता न करणे. |
|---|

१. शाबासकी देणे - ----------

२. हातभार लावणे - ----------

३. पर्वा न करणे - ----------

४. सफल होणे - ----------

५. शिफारस करणे - ----------

प्रश्न २ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. फुलांचा सुवास सर्वत्र पसरला आहे.

उत्तर - नाम - ---------- प्रकार - ----------

२. श्यामची शाळा सुरु झाली.

उत्तर - नाम - ---------- प्रकार - ----------

३. गोपाळ धावत नदीवर गेला.

उत्तर - नाम - ---------- प्रकार - ----------

प्रश्न २ ब) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा. [३]

१. बघ तुला हा कोट होतो का? सर्वनाम - ----------

२. आम्ही दोघे भाऊ एकत्र अभ्यास करतो. सर्वनाम - ----------

३. जे लकाकते. ते सोने नसते. सर्वनाम - ----------

प्रश्न २क) खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा. [३]

१. दादाने मला खाऊला वीस रुपये दिले.

उत्तर - विशेषण - ---------- प्रकार - ----------

२. साहसी राजचे सर्वांनी कौतुक केले.

उत्तर - विशेषण - ---------- प्रकार - ----------

३. ते झाड दिसेनासे झाले.

उत्तर - विशेषण - ---------- प्रकार - ----------

प्रश्न ३ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. [३]

| जीर्ण, चेहरा, आधार, गाल, निश्चय, मधुर, भास, कडू |
|---|

१. संकल्प - ---------- २. जुने - ----------

३. थोबाड - ---------- ४. भ्रम - ----------

५. पाया - ---------- ६. गोड - ----------

प्रश्न ३ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. [३]

| सार्वजनिक, भित्रा, विस्मरण, रसपूर्ण, गौण, अपमान, तरुण, सोपे |
|---|

१. आठवण X ---------- २. कौटुंबिक X ----------

३. सन्मान X ---------- ४. वयस्कर X ----------

५. बिकट X ---------- ६. रुक्ष X ----------

प्रश्न ३ क) खालील शब्दांचे वचन बदला. [३]

१. शिल्पे - ---------- २. चौथरा - ----------

३. वाटचाल - ---------- ४. तलवार - ----------

५. झुडूप - ---------- ६. कपडा - ----------

प्रश्न ३ ड) खालील शब्दांचे लिंग बदला. [३]

१. लेखक - ---------- २. देव - ----------

३. दिवटा - ---------- ४. चिमणा - ----------

५. मुलगा - ---------- ६. बाबा - ----------

प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा. [४]

| चांगले, तात्पर्य, मनात, आपत्ती, आवशक्यता, मामुली, विकास, रत्न, तत्पर्य, नाराज |
|---|

१. सुंदर - ----------  २. गरज - ----------

३. सुधारणा - ----------  ४. उदास - ----------

५. सारांश - ----------  ६. उरात - ----------

७. कुंदन - ----------  ८. जुजबी - ----------

प्रश्न ४ ब) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा. [५]

१. घर (Home) - ----------

२. वाचनालय (Library) - ----------

३. सभा (Meeting) - ----------

४. काळजी (Worry) - ----------

५. अनुवाद (Translation) - ----------

प्रश्न ५. खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा. [५]

१. उत्सुकता, उस्तुकता, ऊत्सुकता, उत्सुकत्ता - ----------

२. अमुलाग्र, आमूळाग्र, अमूलाग्र, आमूलाग्र- ----------

३. श्रमप्रतीष्ठा, श्रमप्रतिष्ठा,श्रमप्रतिष्टा,श्रमप्रतिस्था - ----------

४. वैशिष्ठे, वैशिष्टये, वैशिष्टयें, वैशिष्ठये - ----------

५. कॉम्पूटर, कॉम्पुटर, कॉम्प्युटर, कॉम्पुटेर - ----------

---